विषमता निर्मूलन समिती
संयोजन समिती
राठी चेंबर्स, २० सदाशिव पेठ,
पूना हॉस्पिटल समोर,
पुणे - ४११ ०३०.
ता. ७ नोव्हेंबर, १९८८.

सप्रेम नमस्ते,

विषमता निर्मूलन समितीत आजवर सक्रिय असलेल्या संघटनांच्या प्रतिनिधी व अन्य कार्यकर्त्यांची बैठक हमाल भवन पुणे येथे ता. २२ व २३ आक्टोबर रोजी पार पडली. बैठकीस सुमारे २५ कार्यकर्ते उपस्थित होते.

नियोजित कार्यक्रमाप्रमाणे राखीव जागा व जातीवादाचा प्रश्न, अंगमेहनती कष्टकऱ्यांचे प्रश्न, जंगल जमीन व पडिक जमिनीचा प्रश्न, नविन शैक्षणिक धोरण, कार्यकर्त्यांचे प्रश्न या पाच विषयावर प्रथम गटवार चर्चा झाली. त्या आधारे गट संयोजकाने संबंधित विषयावर टिपण तयार करून देण्याचे ठरले.

विषमता निर्मूलन समितीचे आगामी शिबीर ३,४,५ फेब्रुवारी १९८९ या दिवशी निपाणी येथे होईल. शिबिरातील कार्यक्रमाचे स्वरूप, विषय, वक्ते, इत्यादि विषयी चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. त्याची अंतिम कार्यक्रमपत्रिका आपणास आगाऊ स्वतंत्रपणे पाठविण्यात येईल. या शिबिरास राज्यातील अधिकाधिक संघटना सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावा असाही निर्णय घेण्यात आला. त्याचप्रमाणे कर्नाटक राज्यातीलही सामाजिक संघटनांचा सहभाग मिळविण्याचा प्रयत्न असेल.

शिबिराचे अग्रक्रमाचे विषय म्हणून राखीव जागा आणि जातीवाद आणि अंगमेहनती कष्टकऱ्यांचे प्रश्न असे दोन विषय निश्चित करण्यात आले आहेत. इतर विषयावर गटवार चर्चा, परिसंवाद, भाषणे, इ. पद्धतीने चर्चा होईल. शुक्रवारी दुपारी ३ वाजता शिबिर सुरू होऊन रविवारी दुपारी २ वाजता संपेल.

विषमता निर्मूलन समितीच्या कामकाजात अधिक सुसूत्रता आणि नेमकेपणा आणण्याच्या दृष्टीने समितीच्या घटक संघटना निश्चित करणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील निकष ठरविण्यात आले. त्याची पूर्तता करणाऱ्या संघटना व गट विषमता निर्मूलन समितीचे घटक होऊ शकतील.

.....२

१] निवडणुकीच्या राजकारणाबाहेर राहून सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक कार्य करणाऱ्या संघटना.

२] परकीय मदत न घेता कार्य करणाऱ्या संघटना आणि गट.

३] समितीच्या कामकाजाच्या खर्चासाठी व अन्य कामासाठी वार्षिक किमान १०० रुपये वर्गणी घटक संघटनांनी द्यावी. ते घटकांवर बंधनकारक असेल.

येत्या विषमता निर्मूलन शिबिरामध्ये घटक संघटना, त्यांचे प्रतिनिधी निश्चित करण्यात येतील व त्यातून संयोजन समिती ठरविण्यात येईल.

विषमता निर्मूलन शिबिराचा प्रत्यक्ष कार्यक्रमाचा, निवास, भोजन, इ. प्रवास खर्च वगळता स्थानिक संघटना भरेल. मात्र इतर खर्चासाठी घटक संघटनांनी निधी जमा करून द्यावा. हा निधी सुमारे ५ हजार रुपये असेल. कार्यकर्त्यांचा प्रवास खर्च स्वत: व्यक्तिगत अगर संबंधित घटक संघटनांनी करावा.

[ अजित सरदार ]
संयोजन समितीकरिता.

संयोजन समिती –
नरेंद्र दाभोळकर
गजानन खातू.
बहारू सोनावणे
मेधा पाटकर
अन्वर राजन
नागेश चौधरी